**नि. क्र. ३०९ च्या आदेशावरुन वादी तर्फे सा.क्र.३**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – सुधाकर मलमजी गावित.

**वय** – ४४ वर्ष, **व्यवसाय** – नोकरी,

**नेमणूक**– विशेष भूसंपादन अधिकारी क्र.६, कोल्हापूर.

**सरतपास – श्री. एस. एम. देशपांडे वकील.**

**१.** मला आज साक्ष देण्यासाठी न्यायालयाचे समन्स मिळाले आहे. सदर साक्षी समन्स उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.६ यांच्या नावे होते. त्यांनी मला साक्ष देण्यासाठी अधिकारपत्र दिले आहे. मी आज त्याची माझ्या स्वाक्षरीची प्रत हजर केली आहे. आता मला ती प्रत दाखवली, तिला **नि. क्र.३१९** देण्यात येतो. मी साक्षीसमन्स मध्ये मागणी केलेल्या अर्जांच्या मूळ प्रती सोबत आणल्या आहेत. दि.१४.०९.२०१५ रोजी वसंत पाटील याने आमच्या कार्यालयाला अर्ज दिला होता. सदर अर्ज आमच्या कार्यालयाला मिळाल्या बाबतचा शेरा आहे. आता मला त्याची आमच्या कार्यालयाने दिलेली प्रमाणित प्रत दाखवली. ती मी सोबत आणलेल्या मूळ अर्जाप्रमाणे बरोबर आहे. तिला **नि. क्र. ३२०** देण्यात येतो.

२. दि.०५.१०.२०१५ रोजी पुन्हा वसंत पाटील आणि सुरेश पाटील यांनी आमच्या कार्यालयाला अर्ज दिला होता. सदर अर्ज आमच्या कार्यालयाला मिळाल्या बाबतचा त्यावरती शेरा आहे. आता मला त्या अर्जांची आमच्या कार्यालयाने दिलेल्या प्रमाणित प्रती दाखवल्या. त्या मी सोबत आणलेल्या मूळ अर्जाप्रमाणे बरोबर आहेत. त्यांना अनुक्रमे **नि. क्र. ३२१ व ३२२** देण्यात येतात. दि.०४.०९.२०१५ रोजी आमच्या कार्यालयाने प्रकाश पाटील याला नोटीस दिली होती. आता मला त्या नोटीसीची प्रत दाखवली, तिला **नि. क्र.३२३** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे उलटतपास – श्री. एस. आर. पोवार वकील.**

३. मी साक्षीसमन्स मध्ये मागणी केलेल्या कागदपत्रांचा संपुर्ण अभिलेख सोबत आणला आहे. त्याप्रमाणे सदर प्रकरणामध्ये प्रकाश पाटील याने दि.२९.११.२०१४

रोजी अ. क्र.६३८ च्या पावतीने मोबदला रक्कम १,६०,६५०/– रुपये स्विकारले आहेत. त्याप्रमाणे प्रकाश पाटील याला गट क्र.१२२/अ, १२२/ब, ३० व १०७ मधील ०.६० आर क्षेत्रा साठीची रक्कम देण्यात आलेली आहे. सदर पावती प्रमाणे प्रकाश पाटील याला तक्रारीची निर्गती करुन पैशांचे वाटप झालेले आहे.

**४.** प्रकाश पाटील याच्या नुकसान भरपाईच्या प्रकरणामध्ये फेरफार क्र.४४८ जोडलेला आहे. शासनाने संपादनाची प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर नुकसान भरपाईची रक्कम दिलेली आहे. त्या प्रकरणामध्ये प्रकाश पाटील याच्या नावाचे स्वतंत्र ७/१२ उतारे जोडण्यात आलेले आहेत. मला शासनाने आंबेओहोळ प्रकल्पाची पुन्हा अतिरिक्त नुकसान भरपाईची रक्कम मंजूर केल्याची माहिती नाही. आंबेओहोळ प्रकल्पाच्या पुनर्वसन नुकसान भरपाईची सर्व प्रकरणे उपविभागीय अधिकारी, गडहिंग्लज यांच्या कार्यालयात चालवले जात आहेत.

**५.** मी सोबत आणलेल्या कागदपत्रांप्रमाणे आंबेओहोळ प्रकल्पाच्या अतिरिक्त नुकसान भरपाईची कागदपत्रे जोडलेली नाहीत. नि. क्र.३२० ते ३२२ वरील अर्ज २०१४ सालानंतर करण्यात आलेले आहेत. मी सोबत आणलेल्या अभिलेखात दि. १४.०९.२०१५ रोजी प्रकाश पाटील याचा जबाब नोंदवण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे त्याने नि. दि. दा. क्र.९३/२०१२ मध्ये गट क्र.१२२/अ, १२२/ब, ३० व १०७ च्या जमिनी नसल्यामुळे नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केली आहे. नि. क्र.३२० ते ३२२ वरील तक्रारी अर्ज शासनाने जाहिर केलेल्या स्वेच्छा अनुदाना बाबत करण्यात आलेले आहेत. मला सदर प्रकरणातील प्रकाश पाटील याने दि. २९.११.२०१४ रोजीच्या पावतीने स्विकारलेली रक्कम मूळ मोबदला रक्कम आहे किंवा स्वेच्छा अनुदानाची रक्कम आहे याबाबत सांगता येणार नाही.

**उलट तपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ०९.०४.२०२६.

(आर. पी. थोरे)

आजरा.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.